
# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र

## इयत्ता अकरावी



# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या
समन्वय समितीच्या दिनांक २०.६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या
शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र

## इयत्ता अकरावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

W1P9M3

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
पुनर्मुद्रण :२०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषय समिती**

डॉ राजेंद्र साखरे, अध्यक्ष
डॉ सुरेश पाटील, सदस्य
डॉ राजेंद्र कुंभार, सदस्य
डॉ नंदकुमार दहीभाते, सदस्य
डॉ मीनल ओक, सदस्य
डॉ तृप्ती मोरे, सदस्य
डॉ राजेंद्र खामकर, सदस्य
डॉ इरफान इनामदार, सदस्य
डॉ कैलास वडजे, सदस्य
प्रा.अजित रंगदळ, सदस्य
श्रीमती वर्षा सरोदे, सदस्य सचिव

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासगट समिती**

श्रीमती मीनाक्षी बोंडगे
श्री.सोमनाथ कारंडे
श्रीमती चारूशीला गायकवाड
श्री.संतोष खजिनदार
श्रीमती सुषमा रोकडे
श्रीमती नभा लहाने
श्री.विकास साळवे
श्री.लक्ष्मीकांत सातपुते
श्रीमती रंजना सोनावणे
श्री.दिपक चव्हाण
श्री.पुरुषोत्तम वाकडे

**लेखक**

डॉ राजेंद्र साखरे
डॉ सुरेश पाटील
डॉ नंदकुमार दहीभाते
डॉ. मीनल ओक
डॉ तृप्ती मोरे

**संयोजक**

श्रीमती वर्षा सरोदे
सहायक विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट** : श्री.देवदत्त बलकवडे
**अक्षरजुळणी** : मुद्रा विभाग,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
**कागद** : ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/
**मुद्रक** : M/s

**निर्मिती**

**श्री. सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मितीअधिकारी
**श्री.संदीप आजगांवकर,**
निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**श्री. विवेक उत्तम गोसावी,** नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

आपल्या हाती ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे पुस्तक देताना अतिशय आनंद वाटतो. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाशी आपण अपरिचित असाल. परंतु 'ग्रंथालय' या संज्ञेशी तुम्ही निश्चितच परिचित आहात याबद्दल आमच्या मनात शंका नाही. आपण आपले छंद जोपासत असतो व त्या छंदांमधून आनंद घेत असतो. हे छंद म्हणजे मैदानी व बैठे खेळ, निसर्ग निरीक्षण करणे, वाद्य वाजवणे, गायन इत्यादी. त्याचप्रमाणे ग्रंथांचे वाचन करणे आणि ग्रंथालयात जाणे हाही एक ज्ञानशोधाचा व ज्ञानसाधनेचा निराळा छंद आहे असे म्हणायला हरकत नाही. ज्ञानाबरोबरच मानसिक व आत्मिक समाधान वाचक यातून घेत असतात. ग्रंथालयात आलेल्या वाचकाला ग्रंथ देणे एवढेच कार्य ग्रंथालयातून केले जात नाही. ग्रंथालयातील ग्रंथपाल व त्याच्या सहकाऱ्यांना ग्रंथालयातील वाचन सामग्री व वाचकांना दिल्या जाणाऱ्या सेवा व सोई-सुविधा यांचे शास्त्रोक्त पद्धतीने नियोजन करण्यासाठी अथक परिश्रम घ्यावे लागतात. या सर्व कार्यांचा व वाचकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा अभ्यास ज्या शास्त्रात केला जातो त्या शास्त्रालाच ग्रंथालय व माहितीशास्त्र असे शीर्षक प्राप्त झाले आहे. या विषयाच्या अभ्यासामुळे व्यक्तिमत्त्व विकास व ज्ञानशोध संस्काराचे कार्य करण्यासाठी या शास्त्राची मदत होईल. तसेच या क्षेत्रातील व्यावसायिक संधीही उपलब्ध होतील.

सध्याच्या युगात इंटरनेटमुळे डिजिटल ग्रंथांची व ग्रंथालयांची आवश्यकता नाही असे बरेचदा बोलले जाते. परंतु भारतासह इतर प्रगत देशांमध्ये दिवसेंदिवस प्रत्यक्ष ग्रंथांची खरेदी करून ती वाचण्याकडे कल वाढत असल्याचे दिसून येते. यावरून ग्रंथालयांची अनिवार्यता लक्षात येते. कारण प्रत्यक्ष ग्रंथ व इतर वाचन साहित्य हाताळण्याचे व त्यातून वाचन करण्याचे आणि माहिती प्राप्त करण्याचे मानसिक समाधान हे वेगळेच असते.

आधुनिक काळास ज्ञानाधारित समाज असे म्हटले जाते. कारण 'माहिती' या संकल्पनेला मध्यवर्ती स्थान प्राप्त झाले आहे. दैनंदिन जीवनात शिक्षण, संशोधन, औद्योगिक क्षेत्र, पर्यटन, वैद्यकीय क्षेत्र, व्यवस्थापनशास्त्र या सर्वांमध्ये 'माहिती' या घटकास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रंथालयातील माहिती प्रलेखांचे (वाचन साहित्य) व्यवस्थापन करणे व त्यांच्या साहाय्याने वाचकांना विविध प्रकारच्या सेवा देणे या सर्व कार्यांच्या अभ्यासाचा अंतर्भाव या शास्त्रात होतो. हे शास्त्रही इतर शास्त्रांप्रमाणे काही तत्त्वे, तत्त्वज्ञान व प्रयोगांवर आधारलेले आहे.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाचा अभ्यास करताना तुम्हांला QR कोडवर देण्यात येणारे साहित्य, पाठांत दिलेल्या माहितीपर रंजक, कृतियुक्त विविध चौकटी, रंगीत चित्रे, विविध प्रात्यक्षिके व उपक्रम यांची खूपच मदत होईल. एक नवीन व औत्सुक्यपूर्ण असा अभ्यासक्रम अभ्यासताना तुम्हांसही निश्चित आनंद वाटेल असे वाटते. या विषयाद्वारे खूप बाबी शिकण्यासारख्या आहेत व इतरांना देण्यासारख्या आहेत याची आपणांस जाणीव होईल, अशी खात्री आहे.


**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.


पुणे
दिनांक : २० जून २०१९
भारतीय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ १९४१

## – शिक्षकांसाठी –

नवीन सुधारित अभ्यासक्रमानुसार इयत्ता ११ वी चा ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हा विषय शिकवणाऱ्या सर्व शिक्षक आणि ग्रंथपाल यांचे स्वागत आहे. सदरच्या क्रमिक पुस्तकामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील ग्रंथपालन संबंधीच्या मूलभूत बाबींचा अंतर्भाव आहे. यांत प्रामुख्याने ग्रंथालय आणि समाज, ग्रंथालय व्यवस्थापन, ग्रंथालयातील वाचन साहित्यावर केल्या जाणाऱ्या तांत्रिक प्रक्रिया, संदर्भ सेवा, ग्रंथालय संगणकीकरण व माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) या सर्व पायाभूत घटकांचा समावेश केलेला आहे.

ग्रंथालय व माहितीशास्त्र हा विषय शिकवण्याचा प्रमुख उद्देश असा की विद्यार्थ्यांना ग्रंथालय साक्षर करणे तसेच ग्रंथालय शास्त्रामधील प्रमुख तत्त्वे (Principles) आणि ग्रंथालयातील विविध कार्यांची माहिती देणे. सदरच्या पाठ्यपुस्तकामध्ये ग्रंथालयाची प्रमुख कार्ये उदा., ग्रंथ व वाचन साहित्याचे उपार्जन, त्यावरील प्रक्रिया, व्यवस्थापन आणि माहितीचे प्रसारण इत्यादींचे उदाहरणांसह विस्तृत वर्णन केलेले आहे.

शिक्षक म्हणून आपले योगदान असे की आपल्या या क्षेत्रातील अनुभवाद्वारे विद्यार्थ्यांचा विकास कसा होईल हे पाहणे की जेणेकरून भविष्यात त्यांच्याद्वारे ग्रंथालयाचे व्यवस्थापन चांगल्या पद्धतीने होऊ शकेल.

ग्रंथालय शास्त्राच्या अभ्यास आराखड्याचा प्रमुख हेतू असा आहे की, वेगवेगळ्या तंत्रांचा व तंत्रज्ञानाचा उपयोग ग्रंथालय व्यवस्थापनात चांगल्या प्रकारे कसा केला जाऊ शकतो हे अभ्यासणे. ग्रंथालय शास्त्र ही एक कला व त्याचबरोबर विज्ञानही आहे. विविध शास्त्रीय पद्धती व त्यांतील तत्त्वांचा उपयोग करून या पाठ्यपुस्तकामधील सर्व घटक विकसित केलेले आहेत. जेणेकरून तरुण विद्यार्थ्यांना या विषयामध्ये स्वारस्य निर्माण होऊन त्यांचे शिक्षण सुरू राहावे आणि भविष्यात ग्रंथालयाचे व्यवस्थापन करण्यासाठी पात्र ग्रंथालय व्यावसायिक तयार व्हावेत.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील विषयतज्ज्ञ म्हणून आपली प्रमुख जबाबदारी आहे की, या विषयातील घटक शिकवण्यासाठी सहाय्य करणे. तसेच शिकवत असताना ग्रंथालय शास्त्रामधील सर्व संकल्पना विद्यार्थ्यांना आपल्या अनुभवाच्या आधारे समजावून देणे आणि आवश्यक असेल तेथे उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना अधिक प्रयोगशील बनवणे.

या पाठ्यपुस्तकामधील सुधारित घटक आणि त्यांचे विवेचन असे सादर केलेले आहेत की जेणेकरून विद्यार्थ्यांना या विषयामध्ये आवड निर्माण होईल. त्यादृष्टीने शिक्षकांनी शिकवताना या पाठ्यपुस्तकामधील वेगवेगळ्या उदाहरणांचा, चित्रांचा, तक्त्यांचा, प्रात्यक्षिक कार्यपुस्तिका आणि स्वाध्यायांचा उपयोग करून विद्यार्थ्यांना तर्कशास्त्रीय पद्धतीने विचार करण्यास लावणे. तसेच शिक्षकांकडून असेही अपेक्षित आहे की विद्यार्थ्यांमध्ये या व्यवसायाचे मूल्य (value) वाढीस लावण्याचा प्रयत्न करणे.

## क्षमता विधाने

| अ.क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | ग्रंथालय आणि समाज | • ग्रंथालयाची संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करता येणे.<br>• ग्रंथालयाचा इतिहास समजावून घेणे. ग्रंथालयांच्या विविध प्रकारांची माहिती करून घेणे.<br>• ग्रंथालय शास्त्राचे तत्वज्ञान पंचसूत्रीच्या आधारे समजावून घेणे आणि ग्रंथालयातील त्यांचे उपयोजन समजावून घेणे.<br>• डिजिटल ग्रंथालय व व्हर्च्युअल ग्रंथालयांच्या कार्यांचे अवलोकन करणे. तसेच त्यांची प्रत्यक्ष निर्मिती कशी होते ते समजावून घेणे. |
| २. | ग्रंथालय व्यवस्थापन | • व्यवस्थापन व ग्रंथालय व्यवस्थापन या संकल्पना समजावून घेणे आणि ग्रंथालयाच्या व्यवस्थापनात त्याचा प्रत्यक्ष उपयोग करणे.<br>• ग्रंथालयाचे विविध विभाग व त्यांची कार्ये प्रात्यक्षिकांद्वारे आत्मसात करणे.<br>• ग्रंथालयातील ग्रंथ आणि ग्रंथेतर साहित्याच्या विविध नोंदवह्यांची तंत्रशुद्ध माहिती घेऊन विविध प्रकारच्या नोंदी करण्याचे कौशल्य प्रात्यक्षिकांद्वारे आत्मसात करणे.<br>• ग्रंथालय नियमांची परिभाषा आणि गरज समजावून घेणे. तसेच नियमावली तयार करण्याचे कौशल्य आत्मसात करणे. |
| ३. | ग्रंथालयातील वाचन साधनावरील तांत्रिक प्रक्रिया | • ग्रंथवर्गीकरण पद्धतींचा अभ्यास करून प्रात्यक्षिकांद्वारे ग्रंथांचे वर्गीकरण करण्याचे कौशल्य आत्मसात करणे.<br>• तालिका संहितांचा अभ्यास करणे व प्रात्यक्षिकांद्वारे वाचन साहित्याचे तालिकीकरण करण्याचे तंत्र आत्मसात करणे. |
| ४. | संदर्भ सेवा | • संदर्भ सेवा म्हणजे काय ते समजावून घेणे आणि प्रत्यक्ष संदर्भ ग्रंथांमधून माहितीचा शोध घेऊन वाचकांस ती देणे. |
| ५. | माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान | • माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाची तोंडओळख करून घेणे. या तंत्रज्ञानाचा ग्रंथालयाच्या विविध कार्यांत प्रत्यक्ष उपयोग कसा करता येईल त्याची प्रात्यक्षिकांद्वारे माहिती करून घेणे. |

# अनुक्रमणिका

## विभाग–१ : तात्त्विक


घटक १ : ग्रंथालय आणि समाज ........ १

घटक २ : ग्रंथालय व्यवस्थापन ........ १८

घटक ३ : ग्रंथालयातील वाचन साधनांवरील तांत्रिक प्रक्रिया ........ ३९

घटक ४ : संदर्भ सेवा ........ ५९

घटक ५ : माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान ........ ८२


## विभाग–२ : प्रात्यक्षिक


प्रात्यक्षिक १ : ग्रंथालय वर्गीकरण ........ ९८

प्रात्यक्षिक २ : ग्रंथालय तालिकीकरण ........ ११३

प्रात्यक्षिक ३ : संदर्भ सेवा ........ १३१

प्रात्यक्षिक ४ : कोहा (Koha) मुक्त प्रणाली आज्ञावली कार्यपुस्तिका ........ १३२

संदर्भ सूची (Bibliography) ........ १४३